स.क्रि.के.नं.३०१४४१/२०१३
निशाण क्र. १०१ /क

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास विधिज्ञ एस.आर.पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु

नाव : गोपाळ विश्वास रामुगडे.
वय : ४० वर्षे
व्यवसाय : डेप्युटी ब्रॅच मॅनेजर, मार्केट यार्ड शाखा, कोल्हापूर.

मी स्टेट बॅक ऑफ इंडिया मार्केट यार्ड शाखा कोल्हापूर येथे ऑगष्ट २०२५ पासून डेप्युटी ब्रॅच मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. डॉ.प्रकाश केशवानी हे आमच्या बॅकेच्या रेकॉर्डप्रमाणे आमच्या बॅकेचे ग्राहक आहेत. बॅकेचे स्टेटमेंट मला दाखविलेस मी ओळखु शकतो. आता मला दाखविणेत आलेले बॅकेचे अकौट स्टेटमेंट हे प्रकाश गिरीधरलाल केशवाणी यांचे असून त्यांचा खाते क्रमांक ३०७३९९२९३३७ असा आहे. त्या बॅकेच्या खातेउता-यासोबत मी भा.का.पु.का.क.६५ ब प्रमाणे आवश्यक असलेले प्रमाणपत्र जोडले आहे. या खातेउता-यातील व प्रमाणपत्रावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावरील सही आमच्या बॅकेचे अधिकारी अक्षयकुमार काशिद यांची सही आहे व बॅकेचा शिकका आहे. तसेच प्रमाणपत्रावर बॅकेचा शिक्का व अक्षयकुमार काशिद यांचीच सही आहे. या दस्तामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी १०२ व १०३ देणेत येत आहे. या निशाणी १०३ मधील खातेउता-यावर दि.२६/१२/२०१२ रोजी ५ लाख रुपये रक्कमेचा चेक भरलेची नोंद आहे. तो धनादेश दि.२७/१२/२०१२ रोजी फंडस् इनसफिशिंयट ने अनादरीत झाला आहे. मला आमच्या बॅकेने जारी केलेला चेक रिटर्न मेमो दाखविलेस मी तो ओळखु शकतो. आता मला चेक रिटर्न मेमो दाखविणेत

आला. तो आमच्या बॅकेनेच जारी करणेत आला. त्यावर बॅकेचा शिक्का व सही आहे. सदर मेमो नि.८५ वर आहे. आता मला नि.८४ वरील बॅक ऑफ इंडिया चेक रिटर्न मेमो दाखविणेत आला. त्यावरुनच आम्ही नि.८५ चा रिट्रन मेमो तयार केला. फंडस् इनसफिशिंयट शे-याने तो चेक परत आला. अनादरीत झालेल्या धनादेशाचा क्र.११३४७६ असा आहे.

फिर्यादीतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.आर.बी.खाडे यांचेतर्फे

आरोपी व तर्फे वकीलांना वारंवार पुकारता गैरहजर. सबब आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत.

श्रवणोत्तर स्विकृत,

sd/-

दिनांक - ०२/०७/२०२६

(एन.आर.भळगट)

६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कोल्हापूर.